# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

## Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA)


9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cufffe Parade, Mumbai - 400005. Tel.: 2215 2019 Fax.: 2215 3765 E-mail: mwrra@mwrra.org

क्र. मजनिप्रा/२०१६/PRCL/VIDC/९०/६३ दिनांक : ०८/०२/२०१६

प्रति,
मुख्य अभियंता,
जलसंपदा विभाग, सिंचन सेवा भवन,
जुने सचिवालय परिसर, सिव्हील लाईन्स,
नागपूर - ४४० ००१

विषय : वरोरा औद्योगिक क्षेत्रासाठी मौजा - मार्डा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर येथे वर्धा नदीवर २१ दलघमी क्षमतेचा बंधारा बांधण्यासाठी मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ : मु. अ. जलसंपदा विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. ३५/तांशा-४/वरोरा औ. क्षे.-मार्डा बॅरेज/२०१५ दि. ०२/०१/२०१६

संदर्भीय पत्रान्वये आपल्या कार्यालयाने वरोरा औद्योगिक क्षेत्रासाठी मौजा - मार्डा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर येथे वर्धा नदीवर २१ दलघमी क्षमतेचा बंधारा बांधण्याच्या प्रस्तावास मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत शिफारस केलेली आहे.

सदर बंधाऱ्यासाठी ४२.१५ दलघमी वार्षिक पाणी वापराकरिता मुख्य अभियंता (नियोजन व जलविज्ञान) नाशिक यांनी दि. १२/०३/२००८ रोजी अनुकुल पाणी उपलब्धता प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच दि. ०४/११/२०१५ रोजी मुंबई येथे नियामक मंडळाच्या ६० व्या बैठकीमध्ये "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळमार्फत (मऔविम) स्वखर्चाने २१.०० दलघमी साठवण क्षमतेचा बंधारा बांधण्यासाठी मजनिप्राची मान्यता घेण्याच्या अटीच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यासंबंधीचा ठराव" संमत झाला आहे. सदर कामाकरिता मऔविमने रु. १०३७१.०० लक्ष अंदाजपत्रकीय किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. सदर बंधाऱ्याच्या संकल्पचित्रांस CDO नशिक कडून सहमती (Vetting) घेण्यात आली असून अन्य विभागांची आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे मऔविमने

प्राप्त केलेली आहेत. सदर प्रकल्प महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्वखर्चाने नियोजित स्थळी बांधणार असून सर्व पाणी वरोरा औद्योगिक क्षेत्रासाठी वापरणार असल्याचे नमूद केलेले आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम ११(च) नुसार प्राधिकरण मुख्यत्वे खालील बाबींची सुनिश्चिती करुन प्रकल्पांना मान्यता देते. मंजुरीसाठी सादर केलेले प्रकल्प खालील सर्व अटींची पूर्तता करीत असला पाहिजे:-

१) प्रकल्प मंजूर एकात्मिक राज्य जल आराखड्याचा भाग असणे

२) प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य असणे

३) प्रकल्प जलवैज्ञानिक दृष्ट्या viable असणे

४) प्रकल्प पर्यावरणीय दृष्ट्या viable असणे

५) राज्यपालांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशांची पूर्तता झालेली असणे

सदर प्रस्ताव गोदावरी खोऱ्यामध्ये येत असून गोदावरी खोऱ्याचा एकात्मिक राज्य जल आराखडा अद्याप मंजूर झालेला नाही. वरील अटींपैकी क्र. (१) येथील अट पूर्ण होत नसल्यामुळे सद्यस्थितीत प्राधिकरणाच्या कलम ११(च) नुसार मान्यतेशिवाय प्रस्ताव परत पाठविण्यात येत आहे.

(डॉ. सुरेश कुलकर्णी)
सचिव

प्रत

१) प्रधान सचिव (जसंप्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड मुंबई - ४०००३२.

२) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१.

३) अतिरिक्त मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१.

४) अधीक्षक अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सिव्हील लाईन्स, चंद्रपूर - ४४२ ४०१.